Vol 7 Issue 1 Feb 2017

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Mr. Dikonda Govardhan Krushanahari
Professor and Researcher ,
Rayat shikshan sanstha's, Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur.

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

ISSN: 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 1 | FEBRUARY - 2017

# 'गाभारा' एक आस्वादक शोध

प्रा. आशा काटेखाये
अशोक मोहरकर कला व वाणिज्य महा.
अड्याळ, – जि. भंडारा

## प्रस्तावना

मराठी वाड.मयाच्या क्षेत्रात अत्यंत निष्ठेने समकालिनांत पासून ते आजतागायत नव्याने काव्य, नाटक, ललित लेख लिहू पाहणाऱ्या सर्व साहित्यप्रेमी, रसिक, साहित्यिकांना ज्यांच्या साहित्याने भूरळ पाडली असे कुसुमाग्रज या नावाने काव्यलेखन आणि वि.वा. शिरवाडकर या नावाने नाटक, कादंबरी, ललितलेख करणारे श्री.ग.र. शिरवाडकर होत. त्यांची प्रतिभा ही वाड.मय स्पर्शी होती. त्यांचे काव्य आणि नाटक हे दोन ललित वाड.मय प्रकार मराठी साहित्यात अजरामर ठरले. त्यांच्या हया दोन्ही वाड. मय प्रकारांचा एकमेकावर फार प्रभाव दिसून येते. त्यांच्या नाटकातील संवादात काव्यात्मकता, तर काव्यात–नाटयात्मकता ही सांगड मराठी साहित्य रसिकांना सदासर्वकाळ सुखावणारी आहे. कुसुमाग्रजांच्या काव्याचे स्थान मराठी साहित्य विश्वात मैलाचा दगड ठरलेले आहे. त्यांचे एकूण 13 काव्यसंग्रह प्रकाशित आहेत.

कुसुमाग्रजांनी मराठी इंग्रजीतील काही श्रेष्ठ कवींना आपले प्रकाशदाते करून काव्य लेखनाची वाटचाल सुरू केली. स्वतः कुसुमाग्रज गोविंदाग्रज, बालकवीचे ऋण मानतात. कुसुमाग्रजांच्या मते ''प्रत्येक कवी त्यांची प्रज्ञा कितीही प्रभावी व स्वतंत्र असली तरी कोणातरी अन्य कवीचे ऋण माथ्यावरती वाहत असतो. या अन्य काव्याच्या प्रकाशात त्याला स्वतःच्या प्रतिभेचा शोध लागतो. शब्दाचे स्वभाव समजतात आणि भावनांची विविध सुक्ष्म विलासिते जाणवू लागतात''.

कुसुमाग्रजांच्या काव्यप्रतिभेने विविध विषयाला समर्थपणे स्पर्श केला. त्यांच्या अनेक कविता त्या वेळच्या काळाला परिस्थितीतला अनुसरून आलेल्या आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळ व स्वातंत्र्योत्तर काळ या दोन्ही कालखंडात त्यांनी काव्य लेखन केले. स्वातंत्र्याकांक्षेने झपाटलेल्या समाज मनाचे, क्रांतीविरांचे जयजयकार तर पारतंत्र्याविषयी चीड, संताप, अन्याय, जुलूम विषमता यांच्याविरूध्द आक्रोश, त्याचबरोबर अविचल ध्येयाने झपाटून गर्वाने गीत गाणारी, व्यक्ति विशेषाने झपाटून त्यांच्यातील महात्म्य दर्शविणारी, प्रेमाला उदात्तेच्या शिखरावर नेऊन पोहचविणारी, मानवाचा शोध घेणारी, भक्ती व समर्पणशिलता प्रगट करणारी, समाज मनाचे पडसाद घेणारी सामाजिक जाणिवेची कविता अशा अनेक वलयातून अनेक आशय कवेत घेणारी कुसुमाग्रजांची कविता आहे.



कुसुमाग्रजांनी सामाजिक जाणिवेची कविता ही केशवसुताचा उत्तराधिकारी ठरविणारी कविता आहे. किंबहुना त्यांच्यापुढे गेलेली कविता आहे. त्यांच्या सामाजिक जाणिवेच्या कवितेने विविध आयाम टिपलेले आहेत. समाजसुधारणेसाठी ज्यांनी आपले आयुष्य जाळले त्या महापुरूषांच्या व्यथा वेदनांचे चित्र कुसुमाग्रजांनी अचुकपणे टिपले आहेत. भारतीयांचे आध्यात्मिक जीवन सामाजिक जीवनाच्या अंगाने वावरत असते. त्या आध्यात्मिक आणि सामाजिक जीवनात आलेले विकृती, दांभिकता, स्वार्थी वृत्तीने, माणूसकी कंगाल झालेल्या हजारो वर्षाच्या शोषक बोकाळलेल्या वृत्तीने उदात्त भारतीय संस्कृतीच्या मूल्यांची अवहेलना त्याचे विडंबन कवी कुसुमाग्रजांनी गाभारा या कवितेतून केलेले आहे.

भारतीय जनसामान्य हिंदू धर्मियांच्या आध्यात्मिक व सामाजिक जीवनात मंदिर हया संस्कृतिला फार महत्व आहे. पौराणिक साहित्यात ज्यांचे ज्यांचे महात्म्य वर्णिले ते ते भारतीय हिंदूचे देव ठरले. देवांचे सगुणसाकार रूप म्हणजे मंदिरातील मूर्ती. मूर्तिला स्थापन करण्याचे ठिकाण म्हणजे गाभारा. हे श्रध्देचे आणि आस्थेचे ठिकाण. मंदिराच्या निर्मिती विषयी प्रबोधनकार ठाकरे म्हणतात की इ.स.सनाच्या दुसऱ्या तिसऱ्या शतकापर्यंत हिंदू जनात व हिंदूस्थानात देऊळे घुसलेली नव्हती.' ईं.स. पूर्वीच्या साहित्यात देऊळे दिसत नाहीत. बौध्द कालानंतर हिंदूस्थानात मंदिर निर्माण झाले. प्राचीन हिंदूच्या साहित्यात यज्ञसंस्कृतीला महत्व होते. त्यानंतर मंदिर संस्कृती माहात्म्य वाढले. मंदिर व मंदिरातील देव याविषयी उदात्त कल्पना होती. परमेश्वरांचे सदाचरण, सदविचार, परोपकार, भूतदया, सहानुभूती अशा विविध मूल्यांचे स्मरण माणसाला असावे ही त्यामागील धारणा. परंतु या मूल्यव्यवस्थेत हळूहळू बदल झाला. प्रबोधनकार ठाकरे म्हणतात – 'देऊळ नव्हते तोपर्यंत मंदिरात देव नव्हता, त्याचा सेवकही नव्हता, पण देवळात देव निर्माण झाल्याबरोबर पूजा–पूजारी, भट–भटजी, दान–दक्षिणा, हिरे–मोती, सोना–चांदीचे सिंहासने, नवस, मनोकामना, अभिषेक, उपनयन अशा अनेक बाबी समाज जिवनात रूजविल्या गेल्या.

गाभारा देवाचे निवासस्थान – विश्रांतीस्थान भक्तांच्या देवाकडे बघण्याचा दृष्टिकोन – विघ्नहर्ता, दुःखहर्ता, कल्याणकारी, मोक्षदाता, रंजल्या गांजल्यांचे आशास्थान, देऊळ–मनःशांती, घटकाभर विश्रांती, धकाधकीच्या जिवनात विसावा देणारे ठिकाण. भक्त व देव यांचे उदात्त मौलिक नाते. भक्त–देव यांच्यामधील मध्यस्थी पुजारी, व्यवस्थापक, ट्रस्टी याही मागे उदात्त भावना होती. पण त्यात हहूहळू बदल होत गेला. काळानुरूप मूल्यव्यवस्था बदलत गेली. चांगल्याबरोबर वाईटाचे प्रसारण हळूहळू मंदिर संस्कृतितून होऊ लागले. मध्यस्थ, व्यवस्थापकांच्या लालची वृत्तीने दलाली सुरू झाली. मंदिरात व्यापर सुरू झाला. वर्णव्यवस्थेच्या श्रेष्ठ कनिष्ठ पणाच्या वृत्तीत दरी निर्माण झालनी. श्रेष्ठांचा अहंकार पराकोटीला गेला. ट्रस्टी–पुजारी यासारख्या अहंकारी वृत्तीने स्वतःला इतक्या उंच स्थानावर नेले की, मंदिरातील देव त्यांना हातचे बाहुले वाटायला लागले. त्यावर नियंत्रण करण्याची वृत्ती बोकाळली. अशाप्रकारे उदात्त मूल्यांचे अवमूल्यन कवी कुसुमाग्रजांनी 'गाभारा' या कवितेतून अचूकपणे टिपले आहे. कवीचा दीर्घ समाजचिंतनानुभव गाभारा या कवितेतून दिसून येतो.

कवी कुसुमाग्रजांनी 'गाभारा' या कवितेतून एक नाटयप्रसंग उभा केला. या नाटयप्रसंगात मंदिर, देव, देवाचे स्थान गाभारा, देवाचे भक्त, आणि मंदिराचे व्यवस्थापक ट्रस्टी–पूजारी यांचे दोलायमान भावनिक चित्रण उभे केलेले आहे. यात मंदिर 'गाभारा' धनसंपदा वैभव मिळविण्याचे साधन 'भणंग महारोगी'– अस्पृश्य, हीन, पीडित, सर्वसामान्य वर्गाचे प्रतिक, 'पुजारी / ट्रस्टी' हे अहंकारी–दांभिक वृत्तीचे प्रतिक अशा आशयातून कवी कुसुमाग्रजांनी ही कविता फुलविली आहे. कवी कुसुमाग्रज कवितेची सुरवातच दृष्यचित्रमयी करतात. भक्त मंदिरात येतो तेव्हा मंदिरातील पुजारी भक्तांना शंकेने विचारतो.

दर्शनाला आलात ?
या
पण या देवालयात सध्या देव नाही.
गाभारा आहे.

गाभाऱ्याचे भौतिक मूल्य भक्तांना समजावून सांगतो. हा गाभारा साधा सुध्दा नाही तर मौल्यवान वस्तुने सजविलेला आहे.

'चांदीची मखर आहे

सोन्याच्या समया आहेत

हिऱ्यांची झालर आहे

त्यांचही दर्शन घ्यायला हरकत नाही'.

अशा या वैभवसंपन्न गाभाऱ्याचे मोल देवापेक्षा कमी नाही. हा आभास म्हणजे माणसांनी आपल्या भोगवादी भौतिक जिवनात जे जे मौल्यवान वाटते ते ते देवांनाही आणि आध्यात्मिक जिवनालाही लागू केले. आध्यात्मिक तत्वज्ञानात कंकर आणि सोने यांचे एकच मोल. पण हे मूल्य आज लागू पडत नाही. जणू माणसांची गरज ही देवाचीही गरज निर्माण केल्या गेली आणि आध्यात्मिक मूल्य ढासळली. कुसुमाग्रज म्हणतात त्याप्रमाणे– मंदिरातील देव –

काकड आरतीला उठायचा, शेजारतीला झोपायचा
दरवाजे बंद करून, बरोबर बाराला जेवायचा
दोन तास वामकुक्षी घ्यायचा.

हया सर्व गरजा माणसांच्या तेच नियम देवाला. स्वतःची सोय गैरसोय लक्षात घेऊन देव व देवळाचे नियम तयार केले. माणसांने स्वतःच्या सुखविलासिनी वृत्तीचे देवावर आवरण चढवून स्वतःच्या गरजा भागविण्याचा मार्ग सुरू केला. एवढयावरच न थांबता देवांनाही व्यापार केंद्र केली.

रूपयांच्या राशी, मानिक मोत्यांचे ढीग
पडत होते पायाशी, दक्षिण दरवाज्याजवळ.

मोटार गाडयातून रेशमी साडया, टेरीन सूट घातलेले श्रीमंत भक्त येवून मंदिरात हिरे, माणिक मोती, सोने, चांदी यांचे दान व हरिणाच्या गतीने बँकेतील हिशोब वाढवत आहेत तोपर्यंत 'सारे काही ठिक होत ' किंवा 'सारे काही घडत होते हवे तसे' याचा अर्थ मंदिरांच्या नावाखाली ट्रस्टीचे वैभव वाढविणारा देव जोपर्यत आहे तोपर्यंत सर्व ठिक आहे.

'पण एक दिवसी – आमचं दुदैव
उत्तर दाराजवळ आडवलेला
कोणी एक भणंग महारोगी, तारस्वरात ओरडला
'बाप्पाजी बाहेर या !
आणि काकड आरतीला
पहाटे आम्ही पाहतो
तो गाभारा रिकामा'.

कवी कुसमाग्रजांनी 'भणंग महारोगी' हा भारतीय समाज जिवनातील दारिद्रयाचे, दुर्बलतेचे, गरिबीचे, हीनतेचे प्रतीक. 'बाप्पांजी बाहेर या' समाजात गरीब–श्रीमंतीची खाई निर्माण होत आहे. ही विषमतेतील जागृततेचे प्रतिक. पण एके दिवशी देव महारोग्यांच्या हाकेला धावून जातो तेव्हा इथल्या ट्रस्टींना 'आमचं दुदैव' वाटते. भेदाभेदाचे हे विष फोफावत असल्याची जाण कवी कुसुमाग्रज करून देतात.

'पोलिसात वर्दी, आम्ही दिलीच आहे
परत कदाचित येईलही
पण महारोग्यांच्या वस्तीत तो राहिला असेल
तर त्याला पुन्हा, प्रवेश द्यावा की नाही
याचा विचार करावा लागेल
आमच्या ट्रस्टींना.

माणसाची माणुसकी गळून पडली आहे, याची जाणीव कवी कुसुमाग्रज करून देतात. जे जे भेटे भूत। ते तें मानिजे भगवंत' हा भारतीय हिंदू

संस्कृतीचा आत्मा आहे. एवढेच नाही तर पशू, पक्षी, वृक्ष, पाषाण यांच्यातही देवाची प्रचिती मानणारे, चराचरात वावरणाऱ्या सृष्टीच्या निर्माण कर्त्यांची पोलिसांत वर्दी आम्हीच दिली आहे. हा अहंकार वर्णाश्रम भेदाचे प्रत्यय आणणारे आहे.

महात्मा जोतीबा फुले म्हणतात – 'सृष्टीचा निर्माता देव, देवाचे निर्माते ग्रंथपुराणे, ग्रंथपुराणांचे निर्माते ब्राम्हणवृंद' 'ब्राम्हणवृंद' हे अशा लोकांचे प्रतिक मानतात की जे भारतीय संस्कृती मूल्यांना मानित नाहीत, ज्यांनी ज्यांनी रूढी परंपरेच्या नावाखाली समाज अधःपतनाला नेला अशा सर्व अहंकारी वृत्तीच्या प्रवृत्तीला मानतात ही प्रवृत्ती स्वतःला देवाचे निर्माते म्हणवितो त्यामुळे त्याच्या वर आमचेच नियंत्रण असले पाहिजे, आम्ही म्हणू तसे देवाने वागले पाहिजे, ही अपेक्षा.

भारतीय समाज संस्कृतीत, अनेक ग्रंथात स्पृशास्पृश कल्पना आहे. ही कल्पना माणसामाणसात भेद उत्पन्न करणारी आहे. या स्पृश्यस्पृश्य कल्पनेत माणूस तर गुरफटलेला आहे, पण देवही सुटलेला नाही. कुसुमाग्रज स्पृशास्पृश्य ही कल्पना अंताच्या टोकाला जावून बसलेली आहे याची गंभीरता लक्षात आणून देतात. जो देव इथला विषमतावादी समाजव्यवस्थेला व्यवस्थित करू पाहत असेल तर त्या देवालाच म्हणजे त्या मुल्यव्यवस्थेला, त्या परिवर्तनाला आम्ही स्विकारणार नाही अशा आशयातून कवी कुसुमाग्रजांनी वास्तवता रेखाटली आहे.

जयपूरला पत्रव्यवहार चालू आहे
दुसऱ्या मूर्तीसाठी. पण तुर्त
गाभाऱ्याचं दर्शन घ्या
तसं म्हटलं तर
गाभाऱ्याचंच महत्व अंतिम असते
गाभारा सलामत
तो देव पचास.

देव नसला तरी चालेल गाभारा महत्वाचा. गाभारा हा इथला ट्रस्टी लोकांच्या अस्तित्वाचे स्थान, अशी दांभिक वृत्ती, लालच जोपर्यंत आहे तोपर्यंत विषमता, भेदाभेद निर्माण करून स्वार्थी वृत्ती जिवंत ठेवता येते हा अहंकार समाजात बोकाळत आहे यांची जाण कवी कसुमाग्रज करून देतात.

कवी कुसुमाग्रज 'गाभारा' या कवितेतून एका समाजविघातक वृत्तीचे सुबोध, प्रासादिक रचनेत, ओघवती भाषेत डोळयापुढे प्रसंग उभा रहावा अशा चित्रमयी भाषेत वाचकापुढे मांडतात. आजच्याही काळात गाभारा कवितेचे पडसाद उग्ररूपाने दिसून येतात. स्वातंत्र्यानंतरही लोकशाही ही मूल्य अंगीकारल्या समाजव्यवस्थेचे विदारक चित्रण गाभारा या कवितेतून प्रकर्षाने जाणवते.

*निष्कर्ष :–*

1) गाभारा ही कविता वाच्यार्थप्रधान असली तरी आशयगहनता हे तिचे वैशिष्टये आहे..
2) सात्विक मूल्यांना लागलेली किड याचे प्रत्यय म्हणजे गाभारा कविता होय.
3) गाभारा हया कवितेत कुसुमाग्रजांनी देव, मंदिर, गाभारा, पुजारी, मंदिराचे व्यवस्थापक त्यांचे ट्रस्टी इ. घटकांचे त्यांच्या बदलत्या विद्रुप रूपाचे वर्णन आलेले आहे.
4) सत्व सोडून दुय्यमत्व लाभलेल्या वृत्तीला उजाळा देणाऱ्या समाजवृत्तीचे विच्छेदन कवी कुसमाग्रजांनी केलेला आहे.
5) गाभारा या कवितेतून जनसामान्यांची देवाविषयीची धारणा आणि पुजारी ट्रस्टीच्या स्वार्थी दांभिक दृष्टिकोन कुसुमाग्रजांनी नेमका टिपला आहे.
6) पूर्वापार चालत आलेल्या स्पृशास्पृश्य ही संकल्पना केवळ मानवापुरती मर्यादीत नसून देवही त्यातून सुटलेला नाही. अशा विषमतेचे, भेदाभेदाचे चित्रण गाभारा या कवितेतून कुसुमाग्रजांनी केलेले आहे.
7) देवापेक्षाही ट्रस्टी / पुजाऱ्यांची श्रेष्ठता मिरविण्याच्या वृत्तीचे प्रत्ययकारी दर्शन कुसुमाग्रजांनी केले आहे.
8) देव हे समावेशकतेचे, व्यापकतेचे प्रतीक, 'भणंग महारोगी' हे अस्पृश्य दीव पीडित समाजव्यवस्थेचे प्रतीक – गाभारा हा ट्रस्टीच्या धनसंपदा मिळविण्याचे साधन, ट्रस्टी हे समाजातील दांभिक ढोंगी, प्रवृत्तीचे प्रतीक म्हणून कुसुमाग्रजांनी रेखाटलेले आहे.
9) गाभारा या कवितेतून समाजातील सामाजिक, आध्यात्मिक, ढोंगी, दांभिक प्रवृत्तीचे वास्तविक दर्शन कुसुमाग्रजांनी विशद केले आहे.
10) मूल्याधिष्ठित समाजव्यवस्थेला नाकारून तिला छिन्न विच्छीन्न करणारी व्यवस्था समाजात रूढ होत आहे याचे दर्शन कवी कुसमाग्रज गाभारा या कवितेतून करून देतात.

*संदर्भग्रंथ :–*

1)कविता आणि प्रतिभा – डॉ. सुधार रसाळ
2)वाड.मयीन दृष्टी आणि दृष्टीकोन – वा.ल. कुलकर्णी
3)आजची मराठी कविता – संपादक – वसंत बापट, डॉ. चारूशिला गुप्ते
4)धर्माची देऊळे आणि देवळाचा धर्म – प्रबोधनकार ठाकरे
5)प्रवाशी पक्षी – संपादक – शंकर वैद्य
6)अर्वाचीन मराठी काव्यदर्शन – अक्षयकुमार काळे

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org